दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www.sahyandrinews.com
Scan QR code to visit... Epaper Portal
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १७१ • Title - Code :- MAHMAR49513 • गुरुवार दि.२१ मार्च २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# आम्हाला वातावरण खराब करायचे नाही आम्हीही आरेला कारे करू शकतो

## विजय शिवतारेंच्या विरोधी भूमिकेवर अजित पवारांचे प्रत्युत्तर

**पुणे (वृत्तसंस्था)–बारामती लोकसभा मतदारसंघासाठी अजित पवार यांनी वातावरण निर्मिती केल्यानंतर शिवसेना शिंदे गटाचे विजय शिवतारे यांनी आक्रमक भूमिका घेत अजित पवारांवर आरोप सुरू केले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगूनही विजय शिवतारे यांनी बारामतीसाठी शड्डू ठोकल्याने बारामतीच्या लोकसभा निवडणुकीत युती आलबेल नसल्याचे दिसून येत आहे. दरम्यान, विजय शिवतारेंच्या भूमिकेवर अजित पवार यांनी टोला लगावला.**



या सर्व पार्श्वभूमीवर अजित पवार यांनी शिवतारेंच्या आक्रमक पवित्र्यावर माध्यमांशी बोलताना प्रतिक्रिया दिली. अजित दादा म्हणाले की, आम्ही सुद्धा आरेला कारे करू शकतो. मात्र, वातावरण आम्हाला खराब करायचं नाही. साथ देतील त्यांना सोबत घेऊ. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे मी आणि देवेंद्र फडणवीसांह बैठक घेणार असून बैठकीमध्ये बसून मार्ग काढू असेही ते म्हणाले.दरम्यान, विजय शिवतरे यांनी घेतलेल्या भूमिकेवर अधिक भाष्य न करता अजित पवार म्हणाले की, शिवतारे यांना मुख्यमंत्री शिंदे यांनी समजावलं आहे. त्यामुळे वरिष्ठांचे ऐकायचे की नाही? हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. प्रत्येकाला उत्तर देण्यासाठी मी कोणत्याही प्रकारे बांधिल नाही. एक-दोन दिवसात शिंदेंसोबत बैठक होणार असून महायुतीमधील वातावरण खराब होईल असं काही बोलू इच्छित नसल्याचे पवार यांनी सांगितले.दरम्यान जागावाटपावर बोलताना सुद्धा अजित पवार यांनी भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले की, महायुतीमधील ८० टक्के जागांचा निर्णय झाला असून २० टक्क्यांसाठी आम्हाला आणखी एकदा बसावं लागेल. बारामतीच्या निवडणुकीवरून कोण कुठे उभं राहणार हा संविधानाने दिलेला हक्क असल्याचे अजित पवार म्हणाले.शिंदे गटाचे शिवाजीराव आढळराव पाटील शिरूरमधून राष्ट्रवादीच्या चिन्हावर लढणार असल्याची चर्चा आहे. त्यांचा पक्षप्रवेशही लवकरच होणार असल्याची चर्चा रंगली आहे. मात्र, अजित पवार यांनी पक्षप्रवेशावर कोणतंही भाष्य केलं नाही. मला तुमच्याकडून माहिती समजत असल्याचे सांगून त्यांनी विषयाला बगल दिली.

## भरधाव वाहनाची पुलाला धडक पाच गंभीर जखमी

**तळोधी (बा.) । प्रतिनिधी**



नागभीड - तळोधी रोडवरील पळसगाव खुर्द जवळील बोकडडोह नाल्यांवर असलेल्या पुलावर सिप्टी कार क्रमांक एम.एच.३४ -बि.एफ. ७४४८ ही कार भरधाव वेगाने पुलावर धडक दिल्याने पाच जण गंभीर जखमी झाल्याची घटना २० मार्च ला सायंकाळी ६.३० वाजताचे दरम्यान घडली.

मिळालेल्या माहितीनुसार नागभीड तालुक्यातील वाढोणा येथिल हरिचंद्र जिगरवार, व दोन जण वाढोणा येथील रहिवाशी आहेत तर सिंदेवाही येथील चेतन रमेश कटारे व अन्य एक जण रहवाशी असल्याची माहिती मिळाली आहे. सदर पाचही जण ब्रम्हपूरी वरून वाढोणा व सिंदेवाही आपले स्वगावी परत जात असतांना पळसगाव खुर्द जवळील बोकडडोह नल्यावरील पुलाला जोरदार धडक दिली. धडक येवडी जोरदार होती की गाडीचा व पुलाचे पिल्लरचा चक्नाचूर झाला . प्रत्यक्ष स्थळी या गाडीतील पाचही जण गंभीर जखमी अवस्थेत होते. घटनेची माहिती नागभीड पोलिसांना मिळताच पोलिस घटनास्थळी दाखल झाले व जखमींना रुग्णालयात उपचारांसाठी ब्रम्हपूरी येथे दाखल करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच नागभीड येथिल थानेदार विजय राठोड व त्यांचे कर्मचारी घटनास्थळी दाखल होवून. जखमींना रुग्णालयात उपचारांसाठी दाखल करण्यात सहकार्य केले. अधिक तपास नागभीड पोलिस करीत आहेत.

## शिरूर लोकसभा मतदारसंघात नाना पाटेकर यांना उमेदवारी?

**पुणे (वृत्तसंस्था)**–लोकसभा निवडणुकीची आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. मात्र, त्यापूर्वीच शिरूर लोकसभा मतदारसंघावरून महाविकास आघाडी विरुद्ध महायुती यांच्यात चांगल्याच आरोप प्रत्यारोपाच्या फैरी झडू लागल्या होत्या. शिरूर लोकसभा मतदारसंघाचे विद्यमान खासदार अमोल कोल्हे यांनी थेट अजित पवार यांना आव्हान देत त्यांच्यावर टीका केली. अजित पवार यांनी देखील त्यांच्या टीकेला सडेतोड उत्तर दिले. मात्र, आरोप प्रत्यारोपात शिरूर लोकसभा मतदारसंघ हा राज्यातील राजकारणात चांगलाच चर्चेचा विजय ठरला. आता या लोकसभा मतदारसंघात खासदार अमोल कोल्हे यांना पाण्यासाठी अभिनेते नाना पाटेकर यांनाच लोकसभा निवडणूक लढण्याची खेळी अजित पवार यांनी आखली होती. मात्र, नाना पाटेकर यांनी त्याला नकार दिला. त्यामुळे आता या मतदारसंघात शिवाजी आढळराव हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून उमेदवार असतील, हे जवळपास निश्चित मानले जात आहे.

शिरूर लोकसभा मतदारसंघात शिवाजीराव आढळराव पाटील यांनी २००९ आणि २०१४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत विजय मिळवला होता. मात्र, २०१९ मध्ये झालेल्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तत्कालीन उमेदवार अमोल कोल्हे यांनी बाजी मारली होती. अमोल कोल्हे यांना विजयी करण्यासाठी अजित पवार यांनी शर्तीचे प्रयत्न केले होते. मात्र, आता परिस्थिती बदलली असून अमोल कोल्हे हे शरद पवार यांच्या सोबत असल्याने अमोल कोल्हे यांना पाडण्यासाठी अजित पवार यांनी चंग बांधला आहे.

## चिमूर वरोरा राज्य महामार्गाने प्रवासी करतात जीवघेणा प्रवास

**चिमूर । प्रतिनिधी**



चिमूर ते वरोरा हा राज्य महामार्ग असून गेल्या सात वर्षापासून या रोडचे काँक्रिटीकरण करण्याचे काम कासव गतीने चालू आहे. चिमूर वरोरा या रोडवरती वाहन चालकाला व प्रवाशांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत असल्याने व अपघाताची शक्यता वाढल्याने या रोडचे काम युद्ध पातळीवर करावे अशी मागणी विद्यार्थी व प्रवाशांनी केली आहे

महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाची वरोरा डेपो ची एम एच -४० एन ९३८२ बस खडसंगी बंदर च्या मधोमध असणारी वेकोली कॉलनी जवळ रोडवरून बस काढत असताना अचानक रोड वर असणाऱ्या चिखलामुळे आणि रोड चे काम अपुरे असल्या मुळे भर उन्हाळ्यामध्ये फसली. बसमध्ये अंदाजे ३० प्रवासी व विद्यार्थी प्रवास करीत होते. ही बस पलटी न झाल्याने सुदैवाने मोठी दुर्घटना टळली या प्रवाशाचा जीव वाचला, नाहीतर मोठा अनर्थ घडला असता. पावसामुळे होणारी रोडची दूरदशा आणि सोबत प्रवासाचा त्रास हा कधी तरी जीवघेणा ठरू शकतो. त्यामुळे या महामार्गाच्या रोडचे काम युद्ध पातळीवर लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावे व प्रवाशांना व विद्यार्थ्यांना होणाऱ्या त्रासापासून दिलासा द्यावा यासाठी प्रशासनाने लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे.

## दोन बैलांचा वाघाने पाडला फडशा

### चिचाळा (कुणबी) शेतशिवारातील घटना

**चिमूर । प्रतिनिधी**

चिमूर तालुक्यातील शंकरपूर पासून तीन किमी अंतरावरील चिचाळा कुणबी येथील शेतकऱ्याचे शेतात बांधून असलेल्या दोन बैलांना वाघाने जागीच ठार केले. ही घटना १९ मार्च च्या रात्री घडली. यामुळे येथील शेतकऱ्यावर फार मोठे आर्थिक संकट कोसळले आहे. चिचाळा कुणबी येथील शेतकरी गजानन संपत चौधरी यांनी आपले दोन्ही बैल शेतामध्ये असलेल्या बाभळीच्या झाडाखाली नेहमीप्रमाणे सायंकाळी साडेसातच्या सुमारास बांधून व बैलाला चारापाणी करून घरी आले. दुसऱ्या दिवशी गजानन चौधरी हा शेतामध्ये गेला असता त्याला दोन्ही बैल मृत्युमुखी पडलेले दिसले. व बैलांचा काही भाग हा जंगली प्राण्याने खाल्ला असल्याने त्याने बाजूच्या शेतकऱ्यांना बोलावून शंकरपूर वनविभागाला फोन द्वारे माहिती दिली . तात्काळ वन विभागाची प्रमुख घटनास्थळी दाखल होऊन चौकशी करून घटनास्थळाचा व दोन्ही बैलाचा पंचनामा करण्यात आला. या घटनेनंतर वनविभागाने शेतशिवाऱ्याच्या परिसरात वनविभागाची गस्त वाढवली असून कॅमेरे लावण्यात आले आहेत. याआधी सुद्धा या शेत शिवारात शेतकऱ्यांच्या पाळीव प्राण्यांच्या वाघाने शिकार केलेल्या असून गजानन चौधरी यांचे सहा वर्षे वय असलेले व एक लाख वीस हजार रुपये किमतीचे दोन्ही बैल वाघाने खाल्ल्यामुळे त्यांचे वर आर्थिक संकट कोसळले आहे. या घटनेमुळे परिसरात वाघाची दहशत निर्माण झाली असून वनविभागाने या वाघाचा बंदोबस्त करावा, आणि गजानन चौधरी यांना वनविभागाने तात्काळ मदत करावी, अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे.या घटनेची माहिती होताच जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष तथा राष्ट्रीय उपाध्यक्ष ओबीसी महासंघ महाराष्ट्र प्रदेश डॉक्टर सतीश वारजूकर यांनी घटनास्थळाला भेट देऊन व गजानन चौधरी यांना पाच हजार रुपयाची प्राथमिक मदत करून त्यांचे सांत्वन केले.

## आणि त्या वृद्ध महिलांच्या चेहऱ्यावर फुलले हास्य



संजय गांधी निराधार योजना व श्रावण बाळ योजना अंतर्गत लाभार्थ्यांचे अनुदान डीबीटी अंतर्गत करावयाचे असल्याने बँक खाते, आधार कार्ड, रेशन कार्ड ची झेरॉक्स व मोबाईल नंबर २५ मार्च पर्यंत तहसील ऑफिस मध्ये जमा करायचे होते. परंतु लाभार्थ्यांना सोईस्कर सोईचे व्हावे यासाठी प्रशासनाने ते कागदपत्रे स्थानिक स्थळी, तलाठी, ग्रामसेवक, कोतवाल यांचे कडे जमा करावे.

**–समिती अध्यक्ष संजय नवघडे**

**चिमूर । शेषराव राऊत**

चिमूर तहसील कार्यालयात सामान्य जनतेची कामे तात्काळ होतील असे क्वचितच घडते. येथील कर्मचारी हे सामान्य नागरिकांची अडवणूक नेहमीच करीत असतात. हा त्रास सामान्य नागरिकांना, वृद्धांना नेहमीच सहन करावा लागतो. असाच प्रकार चिमूर तहसील कार्यालय मध्ये घडला असून लिपिकाने आडकाठी आणल्यामुळे काम न झाल्याने नाराज चेहरा घेऊन त्या वृद्ध महिला बाहेर पडत होत्या. परंतु वाटेतच डॉ सतीश वारजुकर यांची भेट झाली आणि त्यांनी त्यांचे काम तात्काळ केल्याने त्या वृद्ध महिलांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले आणि त्यांनी डॉक्टर सतीश वारजूकर यांना आशीर्वाद देऊन गावाकडे हास्यवदनाने निघून गेल्या.

वृद्धपकाळात सुखी जीवन जगता यावे, निराधार लोकांना आधार मिळावा, यासाठी संजय गांधी निराधार योजना सुरू करण्यात आली. त्यामुळे बऱ्याच निराधार लोकांना आधार मिळाला. परंतु आता नव्याने पुन्हा या योजनेअंतर्गत ऑनलाईन अर्ज करावे लागत असून आणि त्याची प्रत तहसील कार्यालयात द्यावे लागते. ऑनलाईन केल्यानंतर हे प्रत देण्यासाठी तहसील कार्यालय येथे त्या वृद्ध महिला गेल्या असता तेथील संबंधित बाबूंनी हे कागदपत्र घेण्यास नकार दिला. वारंवार विनंती करूनही त्या वृद्ध महिलांची कागदपत्रे लिपिक यांनी घेतली नाही. अखेर त्या महिला काम न झाल्यामुळे कोलमंडलेला निरागस चेहरा घेऊन बाहेर निघाल्या, परंतु तितक्यात राष्ट्रीय उपाध्यक्ष ओबीसी महासंघ महाराष्ट्र प्रदेश तथा समन्व्यक चिमूर विधानसभा डॉ सतीश वारजूकर यांची भेट झाली. त्यांनी आपली समस्या त्यांना सांगितली. त्यांनी लगेचच त्या सर्व वृद्ध महिलांना घेऊन संबंधित बाबू कडे गेले आणि संबंधित बाबुला धारेवर धरून अखेर त्या वृद्ध महिलांचे अर्ज घेण्यास बाध्य केले. सदर वृद्ध महिलांना न्याय मिळाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले आणि वारजूकर यांना आशीर्वाद देऊन ते आपल्या हास्य वदनाने गावाकडे परत गेल्या.

## माढा लोकसभा लढण्यासाठी महादेव जानकर यांनी घेतली शरद पवारांची भेट

**पुणे (वृत्तसंस्था)**–माढा लोकसभा मतदारसंघात महादेव जानकर यांनी महाविकास आघाडीच्या माध्यमातून निवडणूक लढवावी, असा आग्रह शरद पवार यांनी केला आहे. या संदर्भात महादेव जानकर यांनी आज शरद पवार यांची भेट घेतली. या बैठकीमध्ये दोन्ही नेत्यांमध्ये माढा लोकसभा मतदारसंघाबाबत सविस्तर चर्चा झाली. आमच्यामध्ये सकारात्मक चर्चा झाली असून निवडणुकीला अद्याप अवकाश आहे, त्या हिशोबाने आम्ही विचार करत असल्याचे महादेव जानकर यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. महाविकास आघाडीतील जागा वाटप अद्याप जाहीर झालेले नाही. त्यामुळे आमच्यात आता केवळ त्या संबंधी चर्चा झाली असल्याची माहिती देखील त्यांनी यावेळी दिली.

माढा लोकसभा मतदारसंघ महाविकास आघाडीसाठी महत्त्वाचा लोकसभा मतदारसंघ मानला जात आहे. माढा लोकसभेच्या बरोबरच बारामती लोकसभा मतदारसंघात देखील धनगर समाजाचे महत्त्वाचे मतदान आहे. या दोन्ही मतदारसंघात धनगर समाजाच्या मतदानाचा विचार करता, महादेव जानकर यांच्या माध्यमातून शरद पवार यांनी मोठी राजकीय खेळी खेळण्याचा प्रयत्न केला आहे. महादेव जानकर जर माढा लोकसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीचे उमेदवार असतील, तर तेथील धनगर



मतदानाचा फायदा महाविकास आघाडीला होईल. त्याचबरोबर महादेव जानकर सोबत असेल तर बारामती लोकसभा मतदारसंघात देखील धनगर समाजाच्या मतदानाचा फायदा हा खासदार सुप्रिया सुळे यांना होईल, अशी शरद पवार यांना अपेक्षा आहे. त्यामुळे त्यांनी माढा लोकसभा मतदारसंघातून महादेव जानकर यांना उमेदवारी देण्याचा शरद पवार हे प्रयत्न करत आहेत.माढा लोकसभा मतदारसंघाबाबत शरद पवार आणि माझ्यात सकारात्मक चर्चा झाली असल्याची माहिती महादेव जानकर यांनी माध्यमांना दिली. शरद पवार हे देशाचे जेष्ठ नेते आहेत, त्यामुळे आमची नेहमीच भेट होत असते. आता माढा लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडचे जागा वाटप झाल्यानंतर अंतिम निर्णय होईल, तोपर्यंत आम्ही प्रतीक्षा करत असून आता केवळ चर्चा झाली असल्याची माहिती महादेव जानकर यांनी दिली.

# मानवा,तुला जंगलाचा काय उपयोग?

**आपल्या दृष्टीआड असलेल्या सृष्टीचे महत्त्व मानवाला न समजण्याचे हे अगदी स्पष्ट उदाहरण म्हणता येईल. शुद्ध हवा, पिण्याचे पाणी आणि इतरही अनेक बाबी आपल्याला मिळतात, ते या वनांमुळेच! मात्र चंगळवादी जीवनशैलीसाठी केल्या जाणाऱ्या बेसुमार जंगल तोडीमुळे निसर्गाचा समतोल ढासळत चालला आहे, हे सन १९७०च्या दशकापासूनच जाणवू लागले. त्यातून जंगले वाचवण्याची संकल्पना पुढे आली. संयुक्त संघाच्या अन्न व शेती संघटनेच्या सदस्य देशांनी हा वर्ल्ड फॉरेस्ट डे- आंतरराष्ट्रीय वन दिन दि.२१ मार्च २०१२पासून साजरा करण्यास सुरुवात केली. श्रीकृष्णदास (बापू) निरंकारी यांच्या लेखणीतून वनमहात्म्य विशद... संपादक.**



आपण दृष्टीआड सृष्टी! असे नेहमीच ऐकत असतो. पण या सृष्टीच्या आड असे काय आहे? जे आपल्याला दृश्य नाही, दिसत नाही. अशा कितीतरी गोष्टी या सृष्टीची चक्रे फिरवत असतात. यामध्ये दगड, माती, हवा, पाणी असे निर्जीव घटक आहेत. त्याचप्रमाणे झाडे-किडे, माणूस-प्राणी, साप-मासे असे विविध सजीवही आहेत. या सर्वांच्या अनुकूल-प्रतिकूल ससंबंधाने शतकानुशतके पृथ्वीचा इतिहास लिहीला जात आहे. या सर्व सजीव-निर्जीव गोष्टींचा प्रभाव एकमेकांवर पडत असतो. त्याचप्रमाणे यांच्या पूरक वापराने एकूणच जीवसृष्टीचे संवर्धनही होत असते. माणूस हा निसर्गाचा वैरी नसून त्याच्याच मदतीने निसर्गाचे जतन व संवर्धन होऊ शकते. जंगलांतून मिळणाऱ्या संसाधनांचा मनुष्याच्या उपजीविकेशी थेट संबंध आहे. इ.स.२००२ साली जंगल संवर्धनासाठी जैवविविधता कायदा मंजूर झाला. सामुहिक वनहक्क कायदा आला. कारण शासनच मोठाली झाडे तोडून उत्पन्न लाभ घेत असे आणि शेतकरी व सामान्य जनतेला वेठीस धरत असे, अटकाव करत असे. म्हणून शेतकरी व आदिवासी बांधवांनी याविरुद्ध दंड थोपटून आवाज उठविला. आदिवासी बांधवांनी तर नावा नाटे; मावा राज! म्हणत संघर्ष केला. त्यामुळेच त्यांचे व इतर परंपरेने राहणाऱ्या आणि जंगलांचे संवर्धन करणाऱ्या वननिवासी यांच्या जंगलावरील हक्कांना मंजूरी देण्यात आली. याच कायद्यांचा व इतर शासकीय योजनांचा आधार घेत गावांमध्ये बदल घडू लागले आहेत. याची काही उदाहरणे-

आदिवासी भागात सामुहिक वनहक्क मिळालेला गडचिरोली जिल्हा म्हणून नाव ऐकले असालच. येथील एकूण १०२५ गावांनी जैवविविधता समित्या स्थापन केल्या. त्यात मोठ्या प्रमाणात जंगल संवर्धनाला सुरूवात केली आहे. यातूनच लोकांच्या उपजीविकेचा प्रश्नही सुटत आहे. सन २००५ला आलेल्या या कायद्यानुसार जंगलांतील बांबू, तेंदूपत्ता या सर्वांचे मालकी हक्क ग्रामसभेला मिळाले. बांबूसारख्या वनोपजाची व्यवस्था लोकांनीच केली. यातून बांबूकटाई साठीची मजुरी आधीपेक्षा तिप्पट प्रमाणात लोकांना मिळू लागली, शिवाय या बांबूविक्रीतून गावासाठी आवश्यक विकासकामांस लोकांना पैसे मिळाले. कोरची तालुक्यात सालेम, झेंडेपार, अरवीटोला, अंधेरी, टेंभली, काळेगाव तर धानोरा तालुक्यातील लेखा- मेंढा या गावातील लोकांनी सात एकरात नवीन बांबूची लागवड केली आहे. जे जंगल त्यांना जगवते, त्या जंगलाला ते जगवत आहेत, वाढवत आहेत.

धुळे जिल्ह्यातील बारीपाडा या गावात काही वर्षांपूर्वी वनव्यवस्थापन समिती स्थापन झाली. उजाडलेल्या जंगलाचे संवर्धन झाले. त्यांत चराईबंदी, कुऱ्हाडबंदी वगैरे करण्याचे लोकांनीच ठरविले. वनांतील सर्व झाडांची मोजणी झाली. मोह या उत्पन्न मिळवून देणाऱ्या झाडांचा लिलाव होऊ लागला, ते उत्पन्न गावातील लोकच घेऊ लागले. त्यातून गावात विकासकामे झाली. जंगल वाढीसह भूगर्भातील पाण्याची पातळीही वाढली. उत्तम शेती होऊ लागली; गाव समृद्ध बनत गेले. आणखी उदाहरण धुळे जिल्ह्यातीलच लामकानी गावाचे आहे. शहरात राहणाऱ्या डॉक्टर धनंजय नेवाडकर यांना झालेल्या अपघातामुळे ते काही महिने सक्तीची विश्रांती घेण्यासाठी गावी आले. त्यावेळी लोकांपुढे गुरांचा चारा दुर्मिळ आणि विहिरीचे पाणी आटण्याची मोठी समस्या आहे, असे त्यांच्या लक्षात आले. गावाच्या बाजूलाच सातपुड्याची पर्वतरांग आहे. साधारण एक हजार एकरांचा हा डोंगर सुजलाम-सुफलाम करण्याचे त्यांनी ठरविले. त्यासाठी रोजगार हमी योजनेचा आधार घेतला. पाणी अडवा; पाणी जिरवा, ही कामे तेथे सुरु केली. गावातील लोकांना रोजगार हमी योजनेचा फायदा व रोजगार मिळाला. त्यातून गावातील गुरांच्या चाऱ्याची व पाण्याची समस्या मिटली, का? तर डोंगर पुन्हा समृद्ध बनला आहे.

कोरोना काळातील मागील तीन वर्षांपासून वन्यपशुंचा मानवी वस्त्यांवर हल्ला होत आहे. जनतेचा नाहक बळी जाऊन त्यांची शिकार ठरत आहे, मात्र वन प्रशासन अजूनही कुंभकर्णी झोपेत आहे. वेळीच बंदोबस्त झाला नसल्याने जनता वन प्रशासनास सहकार्य न करण्याच्या पावित्र्यात उभी ठाकली आहे. त्यामुळे शासनाला जबर नुकसानीचा फटका बसू शकतो. म्हणून सकारात्मक पाऊल उचलण्यासाठी व जंगलाचे महत्त्व सर्वांना पटावे म्हणून शासन आणि विविध संस्था यांनी तत्सम नानाविध कार्यक्रम राबवावेत- अनावश्यक जंगलतोड टाळणे, अधिक झाडे लावणे, मनुष्य वस्त्यातील वन्यपशुंच्या हल्ल्यात जीवितहानी होऊ नये, यासाठी प्रशासनाने दक्ष राहणे, जंगलांपासून मिळणारी उत्पादने आणि होणारे फायदे जाणणे इत्यादी जंगलांना सतत भेट देवून माहिती मिळविणे, आदींचा समावेश असतो. जंगलांबाबत आस्था आणि जंगलतोडीमुळे होणाऱ्या हवामानातील बदलांबद्दल काहींना चिंता वाटते. अशा सर्वांना जागतिक पातळीवर व्यासपीठ मिळावे, हा देखील वनदिन साजरा करण्यामागचा उद्देश आहे. बदलत्या हवामानावर भविष्यात उपाययोजना करताना आणि धोरण आखताना जंगलांबाबत योग्य विचार होत असल्याची खात्री या मंचावरून एकत्रितपणे करता येईल. जसे वनांवरील हक्क लोकांना मिळत आहे, तसेच जंगल संवर्धन आणि जतन करण्याची जबाबदारीही लोकांकडे आहे. ज्या भागांत वनव्यवस्थापन समिती नाही किंवा नुसतीच कागदोपत्री आहे, अशा काही गावांतून लोकांना पर्यटनाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होत आहे, मात्र बेजबाबदारपणामुळे त्यावर नियंत्रण नाही. यातून जंगलांचा विनाशच जास्त होत आहे व नको त्या वाईट प्रवृत्ती बोकाळत आहेत. यासाठी संतुलित, शाश्वत, जबाबदार लोकसहभागातून होणाऱ्या वन व्यवस्थापनातूनच शाश्वत उपजीविका निर्माण होईल. सोबतच सर्वांनाच शुद्ध हवा आणि शुद्ध आरोग्य अनुभवता येईल, यात यत्किंचितही शंका नाही!

!! आंतरराष्ट्रीय वनदिन सप्ताहाच्या समस्त मानवमात्रांस हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

**श्रीकृष्णदास (बापू) निरंकारी.**
**मु. पो. ता. जि. गडचिरोली**
**फक्त व्हॉ. नं. ९४२३७१४८८३.**

# निवडणुकीत भारनियमनामुळे रोष नको म्हणून सरकार १५ ऐवजी १८ रु. दराने वीज खरेदी करणार

**भुसावळ**–लोकसभा निवडणुकीच्या काळात राज्यात वीज भारनियमन करण्याची वेळ येऊ नये म्हणून सरकारने तब्बल १८ रुपये प्रतीयुनीट दराने वीज खरेदी करण्याची तयारी केली आहे. आतापर्यंत १५ रुपये प्रती युनिट दराने वीज खरेदी करण्यात आली आहे. यंदा पहिल्यांदाच मार्च महिन्यातच विजेची मोठी मागणी आहे. एप्रिल व मे महिन्यात तर ती ३० हजार मेगावॅटपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रात १९ व २६ एप्रिल, ७ मे, १३ मे, २० मे रोजी लोकसभेसाठी मतदान होणार आहे. याच काळात तीव्र उन्हामुळे राज्यात भारनियमनाचे संकट ओढवू शकते. यातून जनतेचा सरकारविरोधी रोष वाढू नये म्हणून ऊर्जा विभागाने महागड्या दराने वीज खरेदीचे नियोजन केले आहे.विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील डी आणि डी प्लस क्षेत्रातील उद्योगांना दरवर्षी १२०० कोटी रुपयांची सवलत मिळण्याचा मार्ग मोकळा झाला. या सवलतीची मुदत ३१ मार्च रोजी संपणार होती. मात्र, चेंबर ऑफ मराठवाडा इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे ही सवलत पुढील ३ वर्षांसाठी लागू झाली आहे. ३६०० कोटी रुपयांची वीज सवलत यामुळे प्राप्त होणार आहे.१. यंदा पहिल्यांदाच मार्च महिन्यात कधी नव्हे एवढ्या विजेची मागणी वाढली आहे. त्याचे कारण असे की यंदा तीव्र उन्हाच्या झळा बसू लागल्या आहेत.२. कोरोनानंतर विजेची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यात दरवर्षी सातत्याने वाढतच आहे. त्यात यंदा आणखी भर पडली.३. घरगुती विजेची मोठी मागणी वाढली आहे. यंदा विजेची तूट भरुन काढण्यासाठी महागडी वीज जरी खरेदी केली तरी ग्राहकांना मात्र त्याचा कोणताही आर्थिक फटका बसणार नाही.नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशनने १३ मार्च रोजी आपल्या एकूण वीज निर्मितीचा ४०० अब्ज युनिट्सचा टप्पा ओलांडला. आर्थिक वर्ष २०२२ - २३ मध्ये कंपनीने ३९९.३ अब्ज युनिट्स वीज निर्मिती केली.उच्च मागणीत महानिर्मितीच्या थर्मलचे जनरेशन ६५०० मेगावॅटपर्यंतच गेलेएनटीपीसीने ७७ टक्यांच्या प्लाँट लोड फॅक्टर गाठला. या तुलनेत महानिर्मिती मात्र मिशन ८ हजार मेगावॅटदेखील पूर्ण करू शकत नसल्याची स्थिती आहे. जनरेशन ६५०० मेगावॅटपर्यंतच गेले.राज्याची विजेची मागणी एप्रिल व मे महिन्यात ३० हजार मेगावॅटपर्यंत पोहोचेल मात्र या काळात फक्त १७ हजार मेगावॅटपर्यंत विजेची निर्मिती होऊ शकते. सेंट्रल सेक्टरमधून विजेची खरेदी केल्यानंतरही खुल्या बाजारात किमान ४५००० मेगावॅट विजेची खरेदी करावी लागेल. मागणीनुसार खरेदी झाली तरच उन्हाळ्यात भारनियमन टाळता येणार आहे.पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत १ रुपया कमी दराने वीज शुल्क आकारले जाईल. व्यावसायिक दरानुसार ९ ते १४ रुपयांदरम्यान स्लॅबनुसार उद्योगांना वीजदर आकारला जातो. या सवलतीमुळे प्रती युनिट एक रुपयाची सवलत मिळते.

# गतशतकातील स्त्रीवादी लेखिका-मालती बेडेकर

मालती बेडेकर या मराठीतल्या आद्य स्त्रीवादी लेखिका म्हणुन ओळखल्या जातात. त्या काळी प्रख्यात स्त्रीवादी लेखिका म्हणून त्यांची ख्याती सर्वदूर होती. फक्त साहित्यिकच नाही तर सामाजिक कार्यातही त्यांनी झोकून दिले होते.त्यांचा जन्म अलिबाग येथे १८ मार्च १९०५ रोजी झाला. त्यांचे माहेरचे नाव बाळुताई खरे होते. त्यांच्या आईचे नाव इंदिरा खरे आणि वडिलांचे नाव अनंतराव खरे होते. कृष्णाबाई मोटे या लेखिका आणि समाजशास्त्रज्ञ त्यांच्या मोठ्या भगिनी होत. १९३८ साली बाळुताईंचा विवाह विश्राम बेडेकर यांच्याशी झाला. हिंगण्यातील महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेत त्यांचे शिक्षण झाले. तिथे त्यांच्यावर महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या पुरोगामी विचारांचा प्रभाव पडला. त्या शिक्षण संस्थेची स्थापना कर्वे यांनी केली होती. याच संस्थेतून मालतीबाईंनी महाविद्यालयीन शिक्षणही पूर्ण केले.त्यांनी मराठी या विषयात बी. ए. केले होते. त्यानंतर महर्षी कर्वे यांनीच सुरू केलेल्या कन्या शाळेत त्या शिक्षिका आणि पुढे मुख्याध्यापिकाही बनल्या. १९३६ मध्ये मात्र त्यांनी पेशा बदलला. ब्रिटीश सरकारने 'गुन्हेगार' ठरवलेल्या लोकांचा शोध घेऊन त्यांचा अभ्यास करणारी अधीक्षकाची नोकरी त्यांनी स्विकारली. १९४० पर्यंत त्यांनी हे काम केले.मालती बेडेकर यांनी आपले काही लिखाण विभावरी शिरुरकर ह्या नावाने लिहिले आहे. ते लिखाण कृष्णाबाई मोटे यांचे पती ह.वि. मोटे यांनी प्रकाशित केले. या पुस्तकांनी महाराष्ट्रात त्याकाळी प्रचंड खळबळ उडाली होती.. ही पुस्तके लिहिण्यापूर्वी श्रद्धा, बी.के., कटुसत्यवादिनी, एक भगिनी किंवा बाळुताई खरे या नावांनीही मालतीबाईंनी लेखन केले आहे.त्यांनी सहा कादंबऱ्या, दोन



कथासंग्रह, सहा प्रबंध, प्रौढ साक्षरांसाठी चार पुस्तके, पाच नाटके, एक चित्रपटकथा लिहिल्या तसेच पाच इंग्लिश पुस्तकांची मराठी भाषांतरे केली.उपलब्ध माहितीनुसार त्यांची साहित्य सूची पुढीलप्रमाणे आहे. -अलंकार-मंजूषा कळ्यांचे निःश्वास (लघुलेख संग्रह, विभावरी शिरुरकर नावाने, इ.स. १९३३) खरेमास्तर (१९५३) घराला मुकलेल्या स्त्रिया पारध (नाटक) बळी (कादंबरी. १९५०) मनस्विनीचे चिंतन वहिनी आली (नाटक) विरलेले स्वप्न (कादंबरी) शबरी (१९५६) साखरपुडा (पटकथा, या पटकथेखाली सही होती मालतीबाई बेडेकर ऊर्फ विभावरी शिरुरकर) हिंदुव्यवहार धर्मशास्त्र (सहलेखक : के. एन. केळकर ??) हिंदोळ्यावर (कादंबरी, विभावरी शिरुरकर नावाने, इ.स. १९३३) हिरा जो भंगला नाही (नाटक, पहिला प्रयोग १६ जून १९६९ या दिवशी मुंबईच्या रवींद्र नाट्यमंदिरात झाला.)खरेमास्तर ही मालती बेडेकर यांच्या वडिलांच्या जीवनावर आधारित चरित्रवजा कादंबरी असून त्याचा इंग्लिश भाषेत अनुवाद झाला आहे.त्यांच्या साहित्यिक कारकिर्दीची दखल घेत त्यांना अनेक मानसन्मान आणि पुरस्कार प्राप्त झाले.'पारध' या नाटकाला मुंबई साहित्य संघाचा पुरस्कार मिळाला होता. श्रेष्ठ व प्रदीर्घ वाङ्मयीन कामगिरीसाठी; १९९२ सालचा महाराष्ट्र साहित्य परिषदेचा पुरस्कार व जुलै, १९९८ मध्ये साहित्य संस्कृती मंडळाची गौरववृती हे सन्मान त्यांना देण्यात आले. अखिल भारतीय स्त्री परिषदेच्या अध्यक्षा म्हणून नागपूर, कर्हाड, जळगाव, अलिबाग, मडगाव येथे त्यांची निवड झाली. १९५१ साली प्रजासमाजवादी पक्षातर्फे त्या विधानसभेला उभ्या होत्या. १९५२ साली पीस मिशनतर्फे त्यांना रशियाला आमंत्रित केले गेले होते. प्रौढशिक्षण व बालशिक्षण ह्या समित्यांवर नियुक्ती तसेच इंग्लंड, रशिया, फ्रान्स येथील स्त्री-जीवनाचा अभ्यास व त्या कारणाने त्या देशांना भेटी झाल्या. १९८१ साली मुंबई येथे भरलेल्या 'समांतर' मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले.वयाच्या ९६व्या वर्षी ७ मे २००१ रोजी त्यांचे निधन झाले.यंदा १८ मार्च २०२४ रोजी त्यांची ११९वी जयंती साजरी झाली. त्या निमित्ताने नवीन पिढीला त्यांची ओळख करून देण्यासाठी हा शब्दांजलीपर लेख!

**प्रा. प्रज्ञा पंडित,ठाणे**
**९३२०४४१११६**

# आयाराम-गयाराम राजकीय पुढाऱ्यांना त्यांची जागा दाखविण्याची हिच योग्य वेळ

सध्या जशा-जशा लोकसभा निवडणुका जवळ-जवळ येत आहे व राजकारण तापत आहे तसं-तसं राज्यासह देशात राजकीय भूकंप येतांना दिसतो आणि ही आयाराम-गयाराम परिस्थिती सर्वच राजकीय पक्षांत आपल्याला पहायला मिळत आहे व हळूहळू राजकीय भुकंपाचे झटके यायला सुरुवात झाली आहे आणि हे संपूर्ण राजकीय भुकंपाचे झटके स्वतःच्या स्वार्थापोटी निर्माण झालेली परिस्थिती आहे.सध्या राज्यातच नाही तर देशात अनेक पक्षातील राजकीय पुढाऱ्यांचे किंवा लोकप्रतिनिधीचे दलबदल सुरू आहे.परंतु यासाठी ठोस कायदा नाही किंवा शिक्षा नाही मनात येईल तेव्हा सत्तेसाठी पक्ष बदलविने हा राजकीय पुढाऱ्यांचा धंदा बनल्याचे दिसून येते ही शोकांतिकाच म्हणावी लागेल.यामुळे सर्वसामान्यांचा लोकप्रतिनिधीवरून हळूहळू विश्वास उडत असल्याचे दिसून येते.पक्ष बदलल्या नंतर कोणत्याही पक्षाने त्या राजकीय पुढाऱ्यांना आपल्या पक्षात घ्यायला नको,जर घेतले तर कोणतेही राजकीय पद किंवा लोकप्रतिनिधीत्व पद द्यायला नको.परंतु पक्ष सोडलेल्या राजकीय पुढाऱ्यांना हे सर्वच संपत्तीच्या बळावर ताबडतोब मिळते त्यामुळे असे वाटते की यांच्यासाठी काहीही कायदे कानुन किंवा नियमावली नसल्याचे दिसून येते.राज्यात किंवा देशात पक्ष बदलण्या मागचा मुख्य उद्देश म्हणजे त्यांच्या जवळ असलेली करोडो रुपयांची वाममार्गाने कमविलेली अमाप चल-अचल संपत्ती असने ती वाचवण्यासाठी सत्ताधारी पक्षात प्रवेश करणे किंवा केलेले घोटाळे बंद करण्यासाठी किंवा वाममार्गाने कमविलेल्या संपत्तीवर ईडी किंवा इतर कारवाई होवू नये या उद्देशाने राज्यात राजकीय पुढारी यापक्षातुन त्यापक्षात उंदरा सारख्या उड्या मारतांना दिसतात.तरीही स्वतःला आमदार-खासदार (लोकप्रतिनिधी-जनप्रतिनिधी) समजतात हे स्वतंत्र भारताचे दुर्भाग्य म्हणावे लागेल.राज्यात किंवा देशात गेल्या ३० वर्षांत असा एकही राजकीय पुढारी दिसला नाही की त्याने जनहितासाठी पक्ष सोडला असावा.राजकीय पुढारी या पक्षातुन त्या पक्षात जातात तेव्हा त्यांना नीतिमत्ता,पक्षांचे नियम, पक्षासाठी घेतलेली शपथ, एकनिष्ठता,पक्षाबद्दल स्वाभिमान पक्षाची नियमावली,पक्षाने आपल्याला दिलेले वैभव हे संपूर्ण एका क्षणात विसरतात.स्वत:ला धर्मनिरपेक्ष म्हणारा पक्ष किंवा राजकीय वर्तुळात विरोधी पक्षावर ताशेरे ओढणारे राजकीय पुढारी अचानक सर्वच गोष्टी विसरतात हे कसे काय? कोणत्याही राजकीय पक्षाचा आमदार-खासदार (लोकप्रतिनिधी) किंवा राजकीय पुढारी असो तो जेव्हा पक्ष बदलतो तेव्हा त्याला काहीच कसे काय वाटत नाही?ज्या पक्षाचे अनेक वर्षे प्रतिनिधीत्व राजकीय पुढारी करतो तेव्हा तो विरोधकांवर तुटुन पडतो.अशा वेळेस लोकांना खरे वाटते व तो राजकीय पुढारी लोकांची मने जिंकतो.परंतु हाच राजकीय पुढारी ज्यांच्या विरोधात बोलतो त्यांच्याच पक्षात प्रवेश करतो तेव्हा याला काय म्हणावे? यावरून स्पष्ट होते की आजचा राजकीय पुढारी फक्त स्वार्थासाठीच राजकारण करीत असल्याचे दिसून येते.राजकीय पुढारी जेव्हा पक्ष बदलवितात तेव्हा सर्वसामान्यांच्या जिव्हारी लागते व मन दु:खावते.कारण राजकीय पुढाऱ्यांचे किंवा लोकप्रतिनिधीचे किंवा आमदार -खासदार यांनी सत्तेसाठी पक्ष बदलविने म्हणजे ज्या ताटात खाल्ले त्याच ताटाला छिद्र पाडने होय.महाराष्ट्रातील राजकारण पहाता राजकीय पुढाऱ्यांना असे वाटते की फक्त आपणच खूप हुशार आहोत व बाकी सर्व लोक अणपड-गवार आहेत असे वाटते.कारण गेल्या काही वर्षांपासून राजकीय उलथापालथ मोठ्या प्रमाणात सुरू आहे जनुकाय राजकीय भुकंप आला की काय असे वाटते.राजकीय उलथापालथमध्ये राज्याचा करोडो रुपयांचा चुराडा होतो आहे.याचा सरळ परिणाम गरीब, सर्वसामान्यांना व शेतकऱ्यांना भोगावा लागतो आहे. करोडोचा भ्रष्टाचार राजकीय पुढारी करतील आणि त्याचे प्रयचित्य गरीब,सर्वसामान्यांनी व शेतकऱ्यांनी भोगावे हा कुठला न्याय म्हणावा?कारण गेल्या काही वर्षांपासून राजकीय दृष्ट्या सर्वसामान्यांची किंमत झीरोबजेटमध्ये असल्याचे दिसून येते. यामुळे राजकीय पुढारी तुपाशी आणि सर्वसामान्य उपाशी असल्याचे दिसून येते. राजकीय पुढारी मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार करतात व सत्तेसाठी हपहपल्यासारखे एकमेकांवर तुटुन पडतात. यात सर्वसामान्यांचा किंवा मतदारांचा अजीबात विचार केला जात नाही हे महाराष्ट्राचे दुर्भाग्य म्हणावे लागेल. गेल्या काही वर्षांत राजकीय पुढाऱ्यांनी संपूर्ण हद्दी पार केल्याचे दिसून येते.कारण आमदारांना (लोकप्रतिनिधींना) जनता पाच वर्षांसाठी निवडून यासाठी देते की राज्याचा कारभार सुरळीत चालावा व विकास झपाट्याने व्हावा.परंतु राजकीय पुढारी राज्याचा किंवा सर्वसामान्यांचा विकास करण्यापेक्षा स्वतःच्या विकासावर जास्त भर देतांना दिसतात मग तो कोणत्याही पक्षाचा पुढारी असो.याचे जीवंत उदाहरण सर्वांसमोर आहे.राजकीय पुढारी निवडुण आल्यानंतर मतदारांना विसरतात हे जनतेला चांगलेच लक्षात आले. गेल्या चार वर्षांत महाराष्ट्रात राजकीय पुढाऱ्यांनी तमाशा मांडुन जनतेच्या भावनांशी खेळतांना दिसतात.

काही दिवसापुर्वी सत्ताधारी पक्षाने भ्रष्टाचाराचे आरोप केलेल्या पक्षातील राजकीय पुढाऱ्यांना सत्ताधारी पक्ष आपल्या सोबत घेतो हे दुर्भाग्यच म्हणावे लागेल.मग काय भ्रष्टाचारारी राजकीय पुढारी जर सत्ते सोबत गेले म्हणजे शुद्ध होतात काय? असाही प्रश्न उपस्थित होतो.अशाप्रकारे असे अनेक प्रश्न उद्भवतात.यामुळे राजकीय दृष्ट्या राज्याची परिस्थितीत दिवसेंदिवस अत्यंत बिकट होतांना दिसते. याकरीता कायद्याच्या माध्यमातून राजकीय पुढारी आमदार (लोकप्रतिनिधी) यांच्यावर लगाम कसने अत्यंत गरजेचे आहे.कारण राज्याच्या घडामोडी या लोकशाहीसाठी चिंताजनक आहे.राजकीय पुढारी आपल्या स्वार्थापोटी पक्षांतर करतात व सत्तेत सहभागी होतात.याचा मनस्ताप लोकांमध्ये दिसून येतो.याकरीता पक्षांतर बंदी कायद्यात सुधारणेची गरज आहे.कारण कोणताही पक्ष असो त्याला पक्षाबद्दल निष्ठा व आपुलकी असायला हवी.परंतु सध्याच्या परिस्थितीत सर्वच राजकीय पुढारी निष्ठा,पक्षाचे आचारविचार हे सर्व बाजुला सारुन सत्तेकडे धावतांना दिसतात.यामुळे कायद्याच्या माध्यमातून राजकीय पुढाऱ्यांच्या मुसक्या आवरने अत्यंत गरजेचे आहे.सध्या राज्यातील राजकीय घडामोडीमुळे सर्वसामान्यांनमध्ये अस्थिरतेचे वातावरण निर्माण झाले आहे.जोपर्यंत राजकीय पुढाऱ्यांवर पक्षांतर बंदी कायद्यात सुधारणा होत नाही तोपर्यंत असाच राजकीय खेळ सुरू राहील.त्यामुळे राजकीय पुढारी खुर्चीसाठी सर्वसामान्यांचा बळी घ्यायला सुध्दा मागेपुढे पाहत नाहीत हे त्यांच्या पक्ष बदलण्याच्या प्रक्रियेत वरून दिसून येते.परंतु मतदार बंधु-भगिनी आयाराम-गयाराम राजकीय पुढाऱ्यांना त्यांची योग्य जागा दाखवू शकतात.राज्यातील किंवा देशातील कोणत्याही राजकीय पक्षाचा उमेदवार असो त्याने जर दलबदल केले असेल मतदारांनी कोणालाही मतदान करावे.परंतु दलबदल वाल्या उमेदवाराला अजीबात मतदान करु नये.कारण सत्तेसाठी तो पक्षाचा होवू शकत नाही तर आपला काय होईल याचाही मतदारांनी गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)**

# जीवन वाचविण्यासाठी रक्तदानाची भूमिका महत्त्वाची-विरेंद्र सिंग

## सेंट्रल रेल्वे मजदूर संघातर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन

**वरोरा । प्रतिनिधी**

रक्तदान चळवळीत रक्तदाता हाच महत्त्वाचा घटक आहे. गरजू व्यक्तीचे जीवन वाचविण्यासाठी रक्तदान महत्वाची भूमिका बजावते. मानसाला मानसाचे रक्त लागते म्हणून रक्तदाता हा वर्तमानात व भविष्यातही तितकाच महत्त्वाचा आहे, असे प्रतिपादन सेंट्रल रेल्वे मजदूर संघ, नागपूर मंडळाचे अध्यक्ष विरेंद्र सिंग यांनी येथे केले. सेंट्रल रेल्वे मजदूर संघ, वरोरा शाखाचे सचिव बि.के. भुयान याच्या वाढदिवसाचे औचित्य साधून संघाच्या वरोरा शाखेच्या वतीने येथील रेल्वे हॉस्पिटल परिसरात आयोजित रक्तदान शिबिरात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.कार्यक्रमात सेंट्रल रेल्वे मजदूर संघ नागपूरचे मंडळ सचिव राकेश कुमार, पदाधिकारी संग्रामसिंग, सहायक मंडळ अभियंता रमेश प्रसाद, वरोरा रेल्वे हॉस्पिटलचे डीएमओ डॉ. एम. धनराज, नागपूर येथील जीवन ज्योती रक्तपेढीचे व्यवस्थापक डॉ. आशीष चौधरी, सेंट्रल रेल्वे मजदूर संघ, शाखा वरोरा अध्यक्ष राकेश कुमार, सचिव बि.के भुयान प्रामुख्याने उपस्थित होते.



सिंग पुढे म्हणाले की, 'रक्तदान, महादान ' आहे. रक्ताच्या कमतरतेमुळे कुणाचाही जीव जाणार नाही, याच उदात्त हेतूने आयोजित रक्तदान शिबीर या उपक्रमाचे त्यांनी कौतुक केले. यावेळी त्यांनी सेंट्रल रेल्वे मजदूर संघाची भूमिकाही विशद केली.राकेश कुमार यांनी आपल्या मनोगतात रक्तदानाचे महत्व सांगितले. डॉ. धनराज म्हणाले की, रक्तदानाचा उपयोग गरजू रुग्णांचे प्राण वाचविण्यासाठी होतो. स्वेच्छेने रक्तदानासाठी पुढाकार घेऊन शिबिरात सहभागी झाल्याबद्दल त्यांनी रक्तदात्यांची प्रशंसा केली.भुयान यांनी आपल्या मनोगतात रक्तदान व संघटनेचे महत्त्व सांगितले. ते म्हणाले की रक्तदान शिबिराला उत्तम प्रतिसाद मिळाला. वाढदिवसानिमित्त स्वेच्छेने रक्तदान केल्याबद्दल त्यांनी सर्वांचे आभार मानले.रक्तदान शिबिरात१०२ जणांनी रक्तदान केले.कार्यक्रमाच्या सुरुवातीला म. गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सेंट्रल रेल्वे मजदूर संघाचे संस्थापक एस.एम.शुक्ला यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून द्वीप प्रज्वलन केले. यावेळी कार्यक्रमासाठी उपस्थित मान्यवर पदाधिकाऱ्यांचे स्वागत पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. याप्रसंगी बि.के भुयान यांचा ५७ वा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. शिबिराच्या यशस्वितेसाठी संघटनेचे वरोरा अध्यक्ष राकेश कुमार, पदाधिकारी विनोद कुमार, आशिष हरणे, पीयुष अंबुलकर, नरेश बारीक, सचिन राजूरकर, सचिन ताजने, भंवरलाल मीना, आनंद येटे, जितेंद्र पीटर, मालती सेलुकर, यादगिरी राधाकृष्णन, दिनेश आगलावे, गजानन गोंडे, राकेश देउळकर, रविप्रकाश सुमन, संजय मगरे, मनोज धांडे, विवेक झाडे, सचिन पिंपळकर जीवन ज्योती रक्तपेढीचे किशोर खोब्रागडे, मोनाली राऊत, लोकेश देशमुख आदींनी योगदान दिले.

# उद्धव ठाकरे यांची ताकद किती, हे भाजपला आता कळले-वरुण सरदेसाई

**नागपूर**-भारतीय जनता पक्षाने शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस असे दोन पक्ष फोडले. आता निवडणुकीच्या तोंडावर मनसेला सोबत घेत आहे. त्यामुळे भाजपला एकट्या उद्धव ठाकरे यांची ताकद किती आहे, हे कळून चुकले असल्याचे मत उद्धव ठाकरे गटाचे युवा नेते वरुण सरदेसाई यांनी व्यक्त केले.

लोकसभा निवडणूक प्रचाराच्या निमित्ताने उद्धव ठाकरे यांच्या दौऱ्याचे नियोजन करण्यासाठी ते नागपुरात आले होते. यावेळी नागपूर विमानतळावर प्रसारमाध्यमांशी बोलताना सरदेसाई यांनी भाजपला निवडणूक जिंकणे कठीण वाटत असल्याने आता मनसेला सोबत घेण्यात येत आहे.युवासेनेचे वरुण सरदेसाई म्हणाले की, शिवसेनेसोबत युती असताना भाजपला इतर कोणाची गरज भासत नव्हती. भाजपने आधी शिवसेनेला फोडले, त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसला. त्यानंतरही निवडणुका जिंकणे अवघड वाटत असल्याने आता मनसेला त्यांना सोबत घ्यावे लागत आहे. हे बघता भाजपच्या नेत्यांना आता उद्धव ठाकरेंचे महत्त्व कळून चुकले असेल असेही सरदेसाई म्हणाले.वरुण सरदेसाई म्हणाले की, महाविकास आघाडी व इंडिया आघाडीसाठी अतिशय उत्तम वातावरण आहे. उद्धव ठाकरेंच्या दौऱ्यांनाही जनतेचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. आमच्यासोबत कोण आहे यापेक्षा आमची ताकद कशी वाढेल यावर आम्ही लक्ष केंद्रीत केले आहे. उद्धव ठाकरे यांची भरपाई करण्यासाठी पहिल्यांदा त्यांना शिवसेना फोडून एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री करावे लागले. त्यानेही भागले नाही तर राष्ट्रवादी फोडून अजित पवार यांना उपमुख्यमंत्री कराव लागले. काँग्रेस फोडून अशोक चव्हाण यांना घेतले आणि आता मनसेलाही सोबत



घेत आहे.वरुण सरदेसाई म्हणाले की,केवळ युवकांना संधी मिळाली पाहिजे असे नाही तर जिंकण्याची ताकदही पाहिजे. माझ्यासोबत विरोधात लढताना कोणता उमेदवार भाजपच्या उमेदवाराचा प्रभाव करू शकतो हे पाहणे गरजेचे आहे, ते पाहून वरिष्ठ नेते उमेदवार देतील. उद्धव ठाकरे जे आदेश देशील त्याच पालन आम्ही कार्यकर्ते करत असतो. रामटेकमध्ये पदाधिकाऱ्यांनी मेळावे घेतले आहे. रामटेक लोकसभा असो किंवा विधानसभा असो शिवसेनेची भरपूर ताकद आहे. त्यामुळे तीन पक्ष एकत्र आल्यानंतर जागावाटप कसे होते. हे नेते सांगू शकतील.

# वढा तिर्थक्षेत्रासाठी २५ कोटी रुपयांचा निधी मिळवून दिल्याबद्दल

## ग्रामस्थांच्या वतीने आ.जोरगेवार यांचा सत्कार



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

विदर्भातील पंढरपूर समजल्या जाणा-या वढा तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी २५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिल्याबदल वढा येथील ग्रामस्थांच्या वतीने आमदार किशोर जोरगेवार यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी वढा येथील विठ्ठल रुक्मिणीची आमदार किशोर जोरगेवार यांनी सपत्नीक महाआरती केली.

यावेळी कल्याणी किशोर जोरगेवार, वढा येथील संरपच किशोर वराडकर, माजी सरपंच सुनिल निखाडे, पांढरकवडा सरपंच सुरेश तोतडे, साखरवाही सरपंच निरज बोंढे, नागाडा ग्रामपंचायत सदस्य प्रकाश शेंडे, यंग चांदा ब्रिगेडचे ग्रामीण तालुका अध्यक्ष राकेश पिंपळकर, यंग चांदा ब्रिगेडचे ग्रामीण संघटक मुन्ना जोगी, युवा नेते अमोल शेंडे, महिला शहर संघटिका वंदना हातगावकर, सविता दंढारे, आदिवासी विभाग जिल्हा अध्यक्ष जितेश कुळमेथे, सायली येरणे, भाग्यश्री हांडे, विमल कातकर, अल्का मेश्राम, माधुरी निवलकर, वैशाली मेश्राम, माधूरी काळे, आशु फुलझेले, रुपा परसराम, प्रसिद्धी प्रमुख नकुल वासमवार, कार्तिक बोरेवार, पांढरकवडा सरपंच सुरेश तोतडे, आदींची उपस्थिती होती. वढा तिर्थक्षेत्राचा विकास करण्यासाठी आमदार किशोर जोरगेवार यांचे सातत्याने प्रयत्न सुरु होते. निवडून आल्यानंतर वढा येथे विठ्ठल रुक्मिणीचे दर्शन घेण्यासाठी गेले असता आमदार किशोर जोरगेवार यांनी सदर तिर्थक्षेत्राचा विकास करण्याचा संकल्प केला होता. या दरम्यान त्यांनी शासन दरबारी सातत्यपूर्ण पाठपूरावा सुरु ठेवला होता. या काळात सत्तापरिवर्तन झाले. मात्र आमदार किशोर जोरगेवार यांचा पाठपूरावा सुरुच राहिला. दरम्यान नुकतेच मुंबई येथे पार पडलेल्या हिवाळी अधिवेशात आमदार किशोर जोरगेवार यांनी वढा तिर्थक्षेत्राच्या प्रलंबित मागणीकडे सभागृहाचे लक्ष वेधले होते. त्यानंतर सदर विकासकार्यासाठी २५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीतून सभागृह, प्रशासकीय इमारत, पूजा शेड, घाट बांधकाम, छत्री, विसर्जन कुंड, जल निस्सारण, बायोडायजेस्टर, बाग काम यासह इतर सोयीसुविधातून मंदिर परिसराचा विकास होणार आहे. दरम्यान आमदार किशोर जोरगेवार यांनी वढा येथे जात विठ्ठल रुख्मीनीचे दर्शन घेतले. यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी स्वपतत्निक आरती केली. यावेळी निधी उपलब्ध करुन दिल्याबदल ग्रामस्थांच्या वतीनेही आमदार किशोर जोरगेवार यांचा सत्कार करण्यात आला. हे ठिकाण पवित्र आहे. या तिर्थक्षेत्राचा विकास करण्याचा संकल्प आपण केला होता. आता आपल्याल्या या विकासकामासाठी पहिल्या टप्यात २५ कोटी रुपयांचा निधी मिळाला आहे. हि विठ्ठलाचीच कृपा आहे. आपण केवळ निमित्त आहोत. या निधीतून वढा तीर्थक्षेत्राचा दैदिप्यमान विकास होईल असा विश्वास मला असल्याचे यावेळी आमदार किशोर जोरगेवार म्हणाले. या प्रसंगी ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# नीलेश आमचे उमेदवार व्हावेत त्यासाठी योग्यवेळी सोपस्कार करू-जयंत पाटील

**मुंबई (वृत्तसंस्था)**-पारनेरचे आमदार नीलेश लंके यांच्या राजकीय भूमिकेबाबत अजूनही संभ्रम दिसून येतो. एकीकडे अशी परिस्थिती असताना देखील शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आज लंकेबाबत पुन्हा सूचक विधान केले. काहीही होऊ द्या पण आम्ही अहमदनगरमध्ये तुतारी वाजवणारच, लोकसभेत आमचा विजय नक्कीच होणार, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



जयंत पाटील यांनी बुधवारी शरद पवार यांची मुंबईत भेट घेतली. त्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी ते म्हणाले की, निलेश लंके यांनी तुतारी स्वीकारली की नाही याबाबत मी सध्या भाष्य करणार नाही. कारण असं केल्याने लंके अडचणीत येऊ शकतात आणि मला त्यांना अडचणीत आणायचं नाही. परंतु, मी एक गोष्ट ठामपणे सांगेन की आम्ही अहमदनगर लोकसभा मतदारसंघात तुतारी वाजल्याशिवाय राहणार नाही अर्थात अहमदनगर लोकसभा जिंकल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही.जयंत पाटील पुढे बोलताना म्हणाले की, निलेश लंके हे अहमदनगरमधील लोकप्रिय नेते आहेत. ते तिथून लोकसभेसाठी उभे राहिले तर १०० टक्के निवडून येतील. त्यांच्याबाबत आम्ही या मताचे आहोत की, लंके आमचे उमेदवार व्हावेत. त्याबाबतीत आवश्यक ते सोपस्कार आम्ही योग्य वेळी पूर्ण करू. मी निलेश लंके यांना तुतारी भेट दिली होती. ती तुतारी त्यांनी घेतली. परंतु, मी असं कोणतंही वक्तव्य करणार नाही, ज्यामुळे निलेश लंके अडचणीत येतील.राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अजित पवार गटात असलेले आमदार निलेश लंके यांच्याबाबत गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेला संभ्रम अजूनही कायम आहे. निलेश लंके लोकसभा निवडणूक लढवण्यासाठी शरद पवार गटात जात असावेत, असे स्पष्ट संकेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिलेले होते. त्याप्रमाणे निलेश लंके यांनी गेल्या आठवड्यात पुण्यातील शरद पवार गटाच्या कार्यालयात जाऊन शरद पवार आणि त्यांच्या गटातील नेत्यांची भेट घेतली. त्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत निवडणूक लढवण्याबाबत किंवा शरद पवार गटात प्रवेश करण्याबाबत लंके आणि शरद पवार या दोघांनीही मौन बाळगलं. निलेश लंके यांनी आत्ता शरद पवार गटात जाण्याबाबत किवा अजित पवार गटाविरोधात कोणतंही वक्तव्य केलं तर त्यांच्यावर पक्षाकडून कारवाई होऊ शकते. त्यामुळे निलेश लंके सध्या सावध पावित्र्यात आहेत.

# अजित पवार गटाकडून धमक्या:देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीनंतरही हर्षवर्धन पाटील यांची खंत

**मुंबई (वृत्तसंस्था)**-महायुतीमध्ये असलेल्या सर्वच राजकीय पक्षांनी युतीधर्म पायाला हवा. अजित पवार गटाचे नेते आपल्याला जाहीर भाषणात धमक्या देत आहेत, दमदाटीची भाषा करत आहेत. आणि तेही लोकप्रतिनिधी मंचावर असताना, हे चुकीच आहे. या सगळ्या मुद्यांवर आपण देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत चर्चा केली असल्याची माहिती भाजप नेते हर्षवर्धन पाटील यांनी दिली. हर्षवर्धन पाटील यांनी आज देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीत बारामती लोकसभा मतदारसंघ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दोन्ही नेत्यांमध्ये सविस्तर चर्चा झाली. त्यानंतर ते माध्यमांशी बोलत होते.

बारामती लोकसभा मतदारसंघातील निवडणूक अजित पवार यांच्यासाठी सोपी नसल्याचे दिसून येत आहे. एकीकडे एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे विजय शिवतारे यांनी अजित पवार यांच्या विरोधात थेट भूमिका घेत आपणही उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याचे जाहीर केले आहे. तर दुसरीकडे इंदापूर मध्ये हर्षवर्धन पाटील यांनी देखील आपली नाराजी व्यक्त केली आहे. अजित पवार यांचे कार्यकर्ते आपल्याला दमदाटी करत असून धमक्या देत असल्याचा आरोप हर्षवर्धन पाटील यांच्या कन्या अंकिता पाटील त्यांनी पत्रकार परिषदेत केला होता. त्यानंतर हर्षवर्धन पाटील नाराज असल्याची चर्चा सुरू होती. त्यामुळे हर्षवर्धन पाटील यांची भेट घेत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न केला.देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत झालेल्या बैठकीमध्ये लोकसभेच्या निवडणुकीवर चर्चा झाली असल्याचे हर्षवर्धन पाटील यांनी सांगितले आहे. यामध्ये आपण देवेंद्र फडणवीस यांना स्थानिक कार्यकर्त्यांच्या भावना सांगितल्या असल्याचे देखील हर्षवर्धन पाटील म्हणाले. पंतप्रधानपदी नरेंद्र मोदी यांना पुन्हा एकदा बसवण्याची जबाबदारी आपली आहे. त्यासाठी लागणारे सर्व ते प्रयत्न करणार असल्याचे देखील हर्षवर्धन पाटील म्हणाले. मात्र स्थानिक स्तरावर काही प्रश्न निर्माण झाले आहेत त्या प्रश्नांवर चर्चा करून तोडगा काढणार असल्याचे आश्वासन फडणवीस यांनी आपल्याला दिले असल्याची माहिती देखील हर्षवर्धन पाटील यांनी दिली आहे.स्थानिक स्तरावर प्रश्न सोडवण्यासाठी आपल्या कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत अजित पवार यांच्याशी चर्चा करणे आवश्यक असल्याचे हर्षवर्धन पाटील म्हणाले. त्यावर आपण योग्य तो तोडगा काढू असा विश्वास देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे, अशी माहिती देखील हर्षवर्धन पाटील यांनी दिली. या संदर्भात आपण केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासोबत देखील चर्चा केली असल्याची माहिती हर्षवर्धन पाटील यांनी दिली आहे. आम्हाला देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आश्वासन दिले असून आमचा त्यांच्यावर पूर्ण विश्वास आहे. त्यामुळे महायुतीचे काम करणार असल्याची माहिती देखील हर्षवर्धन पाटील यांनी दिली आहे.

# १७ प्रभागातील ५६ वार्डात यंग चांदा ब्रिगेडच्या वार्ड संघटिकांची नियुक्ती

## नवनियुक्त पदाधिकार्यांना आमदार किशोर जोरगेवार यांच्या नियुक्ती पत्र

**चंद्रपूर । प्रतिनिधी**


यंग चांदा ब्रिगेड सामाजिक संघटनेचा विस्तार झपाट्याने होत आहे. दरम्यान १७ प्रभागातील ५६ वार्डात वार्ड संघटिकांची नियुक्ती करण्यात आली आहे. आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते सर्व नवनियुक्त पदाधिका-यांना नियुक्ती पत्र देण्यात आले आहे. यावेळी यंग चांदा ब्रिगेडच्या महिला शहर संघटिका वंदना हातगावकर, वैशाली मेश्राम, दुर्गा वैरागडे, मंजुषा दरवडे, प्रेमीला बावणे आदींची प्रामूखतेने उपस्थिती होती.



यंग चांदा ब्रिगेड सामाजिक संघटनेच्या वतीने चंद्रपूरात अनेक सामाजिक उपक्रम राबविल्या जात आहे. संघटनेच्या वतीने कोरोना काळात केलेले कार्य उल्लेखनिय आहे. अनेक गरजु पर्यंत संघटना पोहचण्याचा प्रयत्न करत असुन त्यांना मदत केली जात आहे. निराधार महिलांना शासकिय कागदपत्र तयार करुन देणे, दिव्यांगाना साहित्य वाटप करणे, गरजु विद्यार्थ्यांना शिक्षण उपयोगी साहित्य वाटप करणे असे अनेक उपक्रम संघटणेच्या वतीने राबविल्या जात आहे. याच कार्याला प्रेरित होऊन शेकडो महिला यंग चांदा ब्रिगेडमध्ये प्रवेश घेत आहेत.दरम्यान आज ५६ वार्डात वार्ड संघटीकांची नियुक्ती करण्यात आली आहे. यात राष्ट्रवादी नगर वंदना पाटील, बालाजी वार्ड मंजुषा दरवडे, तुलसी नगर शालीनी सुरवाडे, नगिनाबाग शालीनी राउत, लालपेठ वंदना कडूकर, रयतवारी सुजाता कापसे, टावर टेकडी कविता वराडकर, भिवापूर माता नगर चौक अर्चना कावळे, समाधी वार्ड शुष्मा तपासे, सावरकर नगर गिरजा वर्मा, प्रकाश नगर काजल देवांगण, बंगाली कॅम्प गीता कोकमवार, स्वावलंबी नगर दिक्षा सातपूते, तुकुम येथील छत्रपती नगर शोभा उराडे, दादमहाल वार्ड आसमा पठाण, विवेक नगर अंजू मैंद, गोपाल नगर पोर्णिमा तोडकर, घुटकाळा वार्ड माधूरी यांच्या सह अनेक महिलांची वार्ड संघटिका म्हणून नियुक्ती करण्यात आली.आपण या संघटनेचे पदाधिकारी झाल्या आहात. आता आपली जबाबदारी वाढली आहे. आपल्या वार्डातील गरजु पर्यंत पोहचून त्यांना शक्य ती मदत आपल्या माध्यमातून झाली पाहिजे. नागरिकांच्या समस्या आपल्या माध्यमातून आमच्या पर्यंत पोहचल्या पाहिजे. यंग चांदा ब्रिगेड ही संस्था सेवेचे केंद्र आहे. या संघटनेशी आपण जुळल्याने संघटना आणखी वेगाने सामाजिक कार्यात अग्रेसेन होणार असा विश्वास यावेळी बोलताना आमदार किशोर जोरगेवार यांनी व्यक्त केला असुन सर्व नवनियुक्त पदाधिका-यांना शुभेच्छा दिल्या आहे. यावेळी यंग चांदा ब्रिगेडच्या पदाधिका-यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# गावांचा विकास हाच माझा संकल्प ना.सुधीर मुनगंटीवार यांचा निर्धार

## वरोरा तालुक्यातील भटाळा येथील गावकऱ्यांनी मानले आभार







**वरोरा । प्रतिनिधी**

एखाद्या गावाचे समाधान करण्यासाठी फक्त आश्वासन देऊन मी थांबत नाही. एकदा शब्द दिला की तो पूर्ण करतो आणि एवढेच नव्हे तर संकल्प करून विकासाच्या प्रवाहात ते गाव सामील करून घेतो. कारण आदर्श गावांचे निर्माण, हाच माझा संकल्प असतो, असे प्रतिपादन राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तसेच चंद्रपूर-वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी दि.१९ मार्च (मंगळवारी) केले.

वरोरा तालुक्यातील भटाळा येथील श्री महादेव मंदिराला व ऋषी तलावाकरिता ३ कोटी १३ लक्ष रुपयांचा निधी पुरातत्व विभागाच्या माध्यमातून ना. सुधीर मुनगंटीवार यांनी उपलब्ध करून देत गावाच्या प्रगतीची दारे उघडून दिली. याबद्दल स्थानिक जनतेच्या वतीने त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला. याप्रसंगी आयोजित भव्य जाहीर सभेत ना. सुधीर मुनगंटीवार बोलत होते. यावेळी व्यासपीठावर भाजपा जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, शिवसेना जिल्हा प्रमुख नितीन मते, वरोरा विधानसभाप्रमुख रमेश राजूरकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते विलास राजूरकर, डॉ. गायकवाड, बंडू लभाने, सुनील गायकवाड, जिल्हा महामंत्री राजू गायकवाड, माजी पंचायत समिती सदस्य वंदना दाते, राष्ट्रवादी काँग्रेस तालुका अध्यक्ष रविंद्र भोयर, चंद्रकांत कुंभारे, नामदेव डाहुले, डॉ. अंकुश आगलावे,नरेंद्र जीवतोडे, रोहिणी देवतळे, अंकुश आगलावे, विजय राऊत, सुरेश महाजन, सिकंदर शेख, ओमप्रकाश मांडवकर, अमित गुंडावार यांची प्रमुख उपस्थिती होती.'भटाळा गावासाठी काहीतरी करण्याची मनापासून इच्छा होती आणि योगायोग असा की दीड महिन्यातच मला या गावात येऊन आपल्याशी संवाद साधण्याची संधी मिळाली. या गावाच्या विकासासाठी, भगवान महादेवाच्या सेवेसाठी काहीतरी भरीव करण्याची संधी मिळाली. भटाळा हे गाव आदर्श करण्यासाठी माझे प्राधान्याने प्रयत्न असतील,' अशी ग्वाही जिल्ह्याचे पालकमंत्री आणि चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा मतदारसंघाचे भाजपा उमेदवार सुधीर मुनगंटीवार यांनी दिली.ना. मुनगंटीवार पुढे म्हणाले, 'विश्वगौरव पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी यांच्या कुशल नेतृत्वात भारत प्रगतीची नवनवीन शिखरे पादाक्रांत करीत आहे. गरीब आणि कष्टकऱ्यांना केंद्रबिंदू मानून ग्रामीण भागातील माणूस कसा सक्षम होईल, शेतकरी कसा संपन्न होईल, महिला आणि बेरोजगार यांच्यासाठी स्वयंरोजगाराची दारे कशी उघडली जातील यासाठी केंद्र शासनाच्या माध्यमातून मोदी सरकार सातत्याने प्रयत्न करीत आहे. गोरगरीब जनतेच्या आणि कष्टकऱ्यांच्या चेहऱ्यावर सतत आनंद दिसावा, त्यांच्या मूलभूत गरजा पूर्ण व्हाव्यात, उत्तम व सुलभ आरोग्य सेवा मिळावी यासाठी माझे सतत प्रयत्न असतात. हे करताना जात-पात, धर्माचा कधीच विचारही केला नाही. जनतेचा प्रतिनिधी म्हणून लोकांनी जो विश्वास माझ्यावर आतापर्यंत टाकलाय तो सार्थ ठरविणे हेच माझे प्रथम कर्तव्य आहे.'

### फक्त विकासाचा विचार

महाराष्ट्र राज्यात आमदार आणि मंत्री म्हणून काम करताना मी केवळ विकास आणि विकासाचा विचार करत गेलो. म्हणूनच भारतीय जनता पार्टीच्या शीर्षस्थ नेतृत्वाने आता मला देशात काम करण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे. यासाठी आपण मला साथ द्यावी आणि माझ्यासोबत राहावे, असे आवाहन ना. मुनगंटीवार यांनी यावेळी केले.

### विकास कामावर प्रेरित होऊन पक्ष प्रवेश

नथुजी मोहूर्ले, गणपत ठाकरे, चंदन लीलाटे, मोहन लीलाटे, रामदास तोडासे, शिवराम श्रीरामे, आकाश सहदिवे, निखिल आसुटकर, गौरव दमाटे, मनोज दमाटे, मोहित काळे यांनी भाजपात प्रवेश केला.

# सुधीर मुनगंटीवार यांचे भद्रावती व वरोरा नगरीत स्वागत

## ग्रामगीता व भगवी टोपी देवून डॉ.आगलावे यांनी केला सत्कार



**वरोरा । प्रतिनिधी**

सुधीर मुनगंटीवार यांना चंद्रपूर लोकसभेची उमेदवारी जाहीर झाली. त्या निमित्त दि. १८ मार्च रोजी उमेदवारी जाहीर झाल्यानंतर प्रथमतः भद्रावती वरोरा आगमना प्रित्यर्थ ग्रामगीता व भगवी टोपी देवून डॉ. अंकुश आगलावे जिल्हाध्यक्ष भाजपा ओबीसी मोर्चा चंद्रपूर ग्रामीण यांनी सत्कार व स्वागत केले.

डॉ. अंकुश आगलावे म्हणाले की, सुधीर भाऊ यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या मोझरी येथील आश्रमास अ वर्गाचा दर्जा दिला तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे जीवन चरित्रावर चित्रपट निर्माण करीत आहे. असे अनेक कार्य सुधीर भाऊ यांच्या हस्ते झाले आहे.सुधीर भाऊचा सत्कार हा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वयं माझे हस्ते करीत असल्याचे यावेळी डॉ. अंकुश आगलावे यांनी सांगितले. यावेळी सुधीरभाऊ लोकसभेत बहुमताने विजयी होवून जाणार असल्याचा संकल्प घेतला. गुरूदेव सेवा मंडळाने सुधीर भाऊंना लोकसभा उमेदवारी मिळाल्याचे शुभेच्छा दिल्या व सदैव गुरूदेव सेवा मंडळाचे प्रचारक व समर्थक खंबीरपणे पाठीशी उभे राहणार असल्याची ग्वाही यावेळी दिली.

## स्थायी निगराणी पथक व फिरत्या पथकाच्या

# प्रमुखांना विशेष कार्यकारी दंडाधिकाऱ्यांचे अधिकार

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

आदर्श आचारसंहितेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्या आदेशान्वये चंद्रपूर जिल्ह्यात तसेच १३ - चंद्रपूर लोकसभा मतदार संघात विविध पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. यापैकी स्थायी निगराणी पथक (एस.एस.टी.) व फिरते पथक (फ्लाईंग स्कॉड) यांच्या प्रमुखांना विशेष कार्यकारी दंडाधिका-यांचे अधिकार प्रदान करण्यात आले आहे.

फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ (सन १९७४ चा २) चे कलम २१ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी विनय गौडा यांनी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक - २०२४ च्या प्रयोजनार्थ नियुक्त केलेले स्थायी निगराणी पथक (स्टॅटिक सर्व्हिलन्स टीम) आणि फिरते पथक (फ्लाईंग स्कॉड) यांच्या प्रमुखांना निवडणूक प्रक्रिया कालावधीकरीता विशेष कार्यकारी दंडाधिकारी म्हणून घोषित केले आहे. तसेच त्यांना फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम १२९, १३३, १४३ आणि १४४ अन्वये अधिकारी प्रदान करण्यात आले आहे. चंद्रपूर लोकसभा मतदार संघात एकूण ६२ स्थायी निगराणी पथक (राजूरा - १५, चंद्रपूर - ४, बल्लारपूर - ६, वरोरा - १२, वणी - १३ आणि आर्णी १२) तर ४२ फिरते पथक (राजूरा - १२, चंद्रपूर - ४, बल्लारपूर - ८, वरोरा - ४, वणी - ४ आणि आर्णी १०) स्थापन करण्यात आले आहेत. तसेच गडचिरोली लोकसभा मतदार संघातील ब्रम्हपूरी विधानसभा मतदार संघात ८ स्थायी निगराणी पथक आणि ५ फिरते पथक तर चिमूर विधानसभा मतदार संघात ४ स्थायी निगराणी पथक आणि ४ फिरते पथक स्थापन केले आहे.

# चंद्रपूर येथे पारधी समाजाच्या विकासा संदर्भात प्रकल्प अधिकारी कार्यालयात आढावा सभा संपन्न



**वरोरा । प्रतिनिधी**

पारधी समाजाच्या सर्वांगीण विकाससंदर्भात चंद्रपूर एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी यांच्या दालनात प्रकल्प कार्यालय चिमूर व चंद्रपूर यांच्या क्षेत्रातील पारधी समाजाच्या विकासा संदर्भात आढावा सभा प्रकल्प अधिकारी विकास राचेलवार यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली.

पारधी समाजाला शासनाच्या सोयी सुविधा मिळाव्या. शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, आरोग्य या मुलभूत गरजा पासून वंचित असल्याने समाजाचा विकास व्हावा यासाठी आदिवासी पारधी विकास परिषदेचे जिल्हाध्यक्ष धर्मेंद्र शेरकुरे यांनी शासनाकडे तसेच आदिवासी विकास विभागाकडे पाठपुरावा केला होता. याची दखल घेत नागपूर आदिवासी विकास विभागाचे अप्पर आयुक्त रवींद्र ठाकरे यांच्या निर्देशानुसार चंद्रपूर चे प्रकल्प अधिकारी विकास राचेलवार यांनी प्रकल्प कार्यालयात आदिवासी पारधी विकास परिषदेचे जिल्हाध्यक्ष धर्मेंद्र शेरकुरे यांच्या उपस्थितीत सभा घेण्यात आली. या सभेला संबोधित करताना प्रकल्प अधिकारी म्हणाले येणाऱ्या पूढील आर्थीक वर्षात पारधी समाजासाठी,पारधी विकास आराखड्यात विविध योजना यात ठक्कर बाप्पा वस्ती सुधार योजना, शबरी घरकुल योजना,न्यक्लीएटस बजेट योजनेतुन ,बटेर तितर पालन , कोंबडी पालन तसेच सुशिक्षीत बेरोजगारांना व्यवसायासाठी विशेष योजना, जिल्ह्यातील खाजगी तसेच निमशासकीय कंपन्यांमध्ये रोजगार उपलब्ध होणेसाठी जिल्हाधिकाऱ्यांना पत्र देणार व विविध योजना कार्यान्वित करण्यात येणार असे प्रकल्प अधिकारी विकास राचेलवार म्हणाले, सभेला आदिवासी पारधी विकास परिषदेचे जिल्हाध्यक्ष धर्मेंद्र शेरकुरे,एकात्मिक आदिवासी विकास सहाय्यक प्रकल्प अधिकारी चिमुर मॅक डुले, चंद्रपूर चे सहाय्यक प्रकल्प अधिकारी देविदास टिंगुस्ले, आदिवासी विकास निरिक्षक अमोल नवलकार, सचिन आष्टणकर, कार्यकर्ते गजानन पवार व समाज बांधवांची उपस्थिती होती.

# जागतिक चिमणी दिनानिमित्त विद्यार्थ्यांचा अनोखा उपक्रम

## पक्षीमित्र राहुल आगडे जागवतोय पक्षी वाचवण्याचा जागर





**मूल । प्रतिनिधी**

जागतिक चिमणी दिनानिमित्त विद्या मंदिर कॉन्व्हेंट मूल येथील विद्यार्थ्यांनी 'चिमणी वाचवा-चिमणी जगवा या 'विशेष उपक्रमांतर्गत टाकाऊ पाण्याच्या बाटलीपासून आकर्षक असे जलपात्र तयार केले. याद्वारे या शाळेतील विद्यार्थ्यांनी चिमण्यांच्या अन्न-पाण्याची सोय केली आहे.

विद्यार्थ्यांनी पाण्याच्या वाया गेलेल्या बाटल्या,रिकामे डबे, प्लास्टीकची झाकणे यांचा वापर करून चिमण्यांसाठी आकर्षक तयार करून चिमण्यांच्या दाण्या-पाण्याची सोय केली आहे.हे निवारा व जलपात्र परिसरातील झाडांवर,घरातील बाल्कनी,गच्चीवर ठेवण्यात आले.एकाच फिडरमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे धान्य व पाणी ठेवण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. चिमण्यांच्या घटत्या संख्येचा विचार करता 'चिमणी वाचवा-चिमणी जगवा' हा अभिनव उपक्रम राबवला आहे.

## शुभम गिरडे यांची भिसी शहर युवक काँग्रेस अध्यक्ष पदी नियुक्ती



**चिमूर । प्रतिनिधी**

मागील अनेक वर्षापासून शुभम गिरडे राजकीय क्षेत्रात सक्रीय आहे. आपले संघटन कौशल्य , त्याग समर्पण, सेवाभाव व सर्वांना सोबत घेऊन समाजकार्य करण्याची वृत्ती लक्षात घेऊन शुभम केवलराम गिरडे यांची भिसी शहर युवक काँग्रेस अध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली.नियुक्ती पत्र देतांना महासचिव युवक काँग्रेस महाराष्ट्र प्रदेश साईश सतिश वारजूकर, चिमूर विधानसभा युवक काँग्रेस अध्यक्ष रोशन ढोक, आदी अनेक काँग्रेस कार्यकर्ते , पदाधिकारी उपस्थित होते.

# लघु उद्योजक मा.श्रध्दा तनपुरे यांना साई कलारत्न समाजभूषण पुरस्कार जाहीर

**अहमदनगर । प्रतिनिधी**

अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी या ठिकाणच्या अल्पावधीतच लघुउद्योजक क्षेत्रात भरारी घेणाऱ्या लघु उद्योजक. मा.श्रध्दा परशुराम तनपुरे. यांना अंतर राष्ट्रीय पातळीवरील ओम साई विकास प्रतिष्ठान व बी.बी.सी.फिल्म प्रोडक्शन निर्मित साई कलारत्न समाजभूषण पुरस्कार २०२४.चा भव्य व दिव्य पुरस्कार जाहीर झाला आहे. श्रद्धा तनपुरे यांनी सामाजिक कार्यात सहभाग असण्याबरोबरच अनेक बचत गटाच्या माध्यमातून लघु उद्योजक क्षेत्रात चांगल्यापैकी काम केल्यामुळे अनेकांना आपल्या सोबत घेऊन लघु उद्योजक क्षेत्रात सहभागी करण्याचा खारीचा वाटा असल्याकारणाने व अनेक सामाजिक कार्यात खारीचा वाटा उचलणाऱ्या श्रद्धा तनपुरे यांना या पुरस्कार सोहळा समितीचे अध्यक्ष मा.श्री.सुदाम संसारे सर यांनी नुकतेच लघु उद्योजक . मा.श्रध्दा परशुराम तनपुरे यांना पत्र दिले आहे.हा पुरस्कार सोहळा साई च्या पावन व पवित्र आशा जागतिक दर्जाचे तीर्थ क्षेत्र म्हणून ओळखले जाणार्या शिर्डी या ठिकाणी मोठ्या धुमधडाक्यात व लाईट च्या लखलखीत रंगबेरंगी झगमगाटात सिद्ध संकल्प लॉन या भव्य व दिव्य लॉन मध्ये दिनांक ०३/०५/२०२४ वार.शुक्रवारी सायंकाळी ठिक ६ ते १०.वाजेपर्यंत हा सुवर्ण अक्षरांनी लिहीला जाईल आसा पुरस्कार सोहळा होणार आहे.या पुरस्कार सोहळ्यास प्रमुख उपस्थितीत. पुणे येथील प्रसिद्ध चित्रपट क्षेत्रातील दिग्दर्शक,निर्माता व अभिनेतामा .श्री.काळुराम ढोबळे सर व आपल्या भारत देशातील नामांकित नाव असलेल्या नागपूर येथील.मॉडेल व अभिनेत्री.सावी उर्फ सोनी वासनिक मॅडम. तसेच लोणी प्रवरा नगर येथील समाजभूषण. मा.श्री.उत्तम काका घोगरे पाटील व औरंगाबाद येथील प्रसिद्ध चित्रपट निर्माता मा.श्री.सतिष खांडविकर यांच्या शुभ हस्ते हा भव्य व दिव्य पुरस्कार सोहळा मोठ्या थाटातच संपन्न होणार आहे. या कार्यक्रमासाठी श्रद्धा तनपुरे यांच्यावरील प्रेम करणारा स्नेही वर्ग या कार्यक्रमास भरपूर प्रमाणात उपस्थित राहणार आहे.



सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .